# मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे कार्यालय, उस्मानाबाद (धाराशीव)– 413 501.

दूरध्वनी कमांक 02472 224733

कं./रोविले/ 2902/2024 | दिनांक : 28 मार्च, 2024

## जनरेटर देखभाल / दुरूस्ती बाबत
## निविदा सूचना

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद हे उस्मानाबाद जिल्हा न्यायालय तसेच जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेखालील इतर सर्व न्यायालयातील (उस्मानाबाद, उमरगा, तुळजापूर, लोहारा, कळंब, वाशी, भूम आणि परंडा) जनरेटरच्या वार्षिक देखभाल/दुरूस्ती बाबतचे करारासाठी कमीत कमी रकमेच्या मोहोरबंद निविदा मागवित आहोत. सर्वात कमी रकमेची निविदा (L1) विचारात घेण्यात येईल.

### District and Subordinate Courts of Osmanabad Judicial District
### Description of Generator Set

| Sr. No. | Hardware Description | Qty. | Price Per Unit |
|---|---|---|---|
| 1 | Kirloskar Diesel Generator Set 5KVA | 8 | 182400 |
| 2 | Diesel Generator Set 5KVA Portable, two change over with each set | 7 | 176995 |
| | | | |
| | **Total** | **15** | **359395** |

**AMC Location:** 1) Osmanabad 2) Omerga, 3) Tuljapur, 4)Lohara, 5) Kallam, 6) Washi, 7) Bhoom and 8) Paranda.

### खाली नमुद विहीत नमुण्यात निवीदा सादर करण्यात याव्यात

| Sr. No. | Hardware Description | Mention AMC Amount for per DG set (Generator) | | |
|---|---|---|---|---|
| | | AMC Amount for 1 Year | AMC Amount for 2 Years | AMC Amount for 3 years |
| **1** | **Kirloskar Diesel Generator Set 5KVA** | | | |
| **2** | **Diesel Generator Set 5KVA Portable, two change over with each set** | | | |

### जनरेटर देखभाल / दुरूस्ती करारा बाबतच्या शर्ती व अटी.

| कामाचे नांव | जनरेटर देखभाल / दुरूस्ती करार. |
|---|---|
| कराराचा कालावधी | 1.कराराचा कालावधी निवीदेमधील रकमेवरुन 1 वर्ष /2 वर्ष /3 वर्ष असा ठरविण्यात येईल.<br>2. वर नमूद दोन्ही प्रकारच्या जनरेटरची देखभाल /दुरुस्ती करीता निवीदा सादर करणे अनिवार्य राहील. एका प्रकारच्या जनरेटरसाठी आलेल्या निवदेचा विचार केला जाणार नाही.<br>2.खालील नमूद अटी व शर्ती पूर्ण करणा–या व्यवसायिक/कंपनी यांनी आपल्या मोहर बंद निविदा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद या पत्यावर सादर कराव्यात.<br>3.मोहोरबंद निविदा हया **दिनांक 06 एप्रील, 2024** पर्यंत सायंकाळी **5.00** वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. सायंकाळी 5.00 वा.नंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. सर्व मोहोरबंद निविदा हया प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे नावाने पाठवण्यिात याव्यात<br>4.लिफाफयावर **"जनरेटर देखभाल दुरुस्ती करिता निविदा"** असे नमूद करावे व निवीदेमध्ये दोन्ही वेगवेगळया जनरेटरच्या वार्षीक देखभाल व दुरुस्तीच्या कराराच्या रकमेमध्ये प्रति जनरटरच्या एक वर्षाकरीता /दोन वर्षाकरीता/तीन वर्षाकरीता अशा स्वतंत्र रकमा उपरोक्त विहीत नमुण्यात सादर करण्यात याव्यात. |
| आवश्यक कागदपत्रे | व्यवसायिक / कंपनी यांनी खालील कागदपत्रे निविदेसोबत जोडावे.<br>व्यवसायिक / कंपनी पंजीकृत / परवाना प्राप्त असल्याचे शॉप ॲक्ट नुसार परवान्याची छायांकित प्रत. |

| | |
|---|---|
| | |
| **त।।त्रिक अटी व शर्ती** | |
| 1 | जनरेटरची व त्याच्या इतर सर्व उपकरणांची व्यापक (comprehensive) देखभाल / दुरूस्ती राहील. |
| 2 | AMC मध्ये आपणांस नियमीत सर्व्हीसींग, ऑईल बदलणे, जनरेट दुरुस्ती करणे तसेच दुरुस्तीकामी लागणारे सर्व सुटे भागाचा खर्च (जनरेटरची बॅटरी वगळून ) हा वार्षीक देखभालीच्या करारामध्ये मंजूर झालेल्या रकमेध्ये अंतर्भूत असेल याची नोंद घ्यावी. |
| 3 | सदरहू निविदा कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी राखून ठेवलेले आहेत. |
| 4 | कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. |
| 5 | सदरहू करार हा निविदा मंजूर झाल्यानंतर करार झाल्याच्या **दिनांकापासून अमलात येईल.** |
| 6 | संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती करार उस्मानाबाद आणि उमरगा, तुळजापूर, लोहारा, कळंब, वाशी, भूम आणि परंडा येथील न्यायालयात स्थापित केलेल्या संगणक यंत्रसामुग्री करिता राहील. |
| 7 | व्यवसायिक / कंपनी / अभियंत्याकडे यंत्रसामुग्री दुरुस्ती बाबत तकार दिली असता त्यांना **सदरहू तकार 24 ते 48 तासाचे आत हजर राहून दुरूस्ती करून दयावी लागेल** सदर तकारीचे निवारण वेळेत न केल्यास त्यानंतर प्रत्येक दिवसाला रूपये 300/– प्रमाणे दंड आकारण्यात येईल. |
| 8 | दूरध्वनीव्दारे /इमेलद्वारे जनरेटर दुरुस्ती संदर्भात संबधिताने तकार दिल्यास आपणांस त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती स्विकारावी लागेल. तसेच आपणांस तकार नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सर्व न्यायालयाचे ठिकाणी व्यवसायिक/कंपनी यांना स्वखर्चाने जावे लागेल. |
| 9 | जनरेटर यंत्र सामुग्री दुरूस्ती मध्ये सुटे भाग दुरूस्ती करिता नेल्यास त्याची नोंदवहीत नोंद घ्यावी, दोन दिवसाचे आत सदरहू सुटे भाग दुरूस्त करून जोडणी करून दयावी लागेल. |
| 10 | निविदा मंजूर झालेल्या कंपनीला 100/– रूपयाचे बॉन्ड पेपरवर निविदेत अटी व शर्ती बाबत करार करून दयावा लागेल सदरहू 100/– रूपयाचा स्टॅपपेपरचा खर्च कंपनीला सोसावा लागेल. |
| 11 | वर्षिक देखभाल / दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर निविदा मंजूर झालेल्या कंपनीला सोसावे लागेल. |
| 12 | देयक हे त्रैमासिक पध्दतीने त्रैमासिक संपल्यानंतर देयक सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यात येईल. देयक हे व्दिप्रतीत संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास सादर करावे लागेल. |
| 13 | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून देयक अदा करण्यात येईल. रक्कम ही ईएफटी व्दारे अदा करण्यात येईल. |
| 14 | करारानुसार व अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला देखभाल / दुरूस्ती करार संपूर्णतः रदद करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांना राहतील. |

दिनांक : 28 मार्च, 2024
जिल्हा व सत्र न्यायालय,
**उस्मानाबाद.**

**तदर्थ जिल्हा न्यायाधीश–1,**
**तथा जिल्हा प्रकल्प समन्वयक,**
**उस्मानाबाद.**

<u>याची एक प्रत</u> –

1. सदरील निविदा सुचना ही **https://osmanabad.dcourts.gov.in/notice-category/tenders/** या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे
2. जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद / दिवाणी न्यायालय व.स्तर,उस्मनाबाद / मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, उस्मानाबाद व सर्व तालुका यांचे नोटीस बोर्डावर डकविण्याकरीता.